# उपयोजित नीतिशास्त्र

## नीतिशास्त्र

1.मानवी आचरणाचा अभ्यास करणारे शास्त्र.

2.मानवी आचरणाचा आदर्शात्मक अभ्यास करणारे शास्त्र.

3.मानवी आचरणावर दिल्या जाणा–या नीतिनिर्णयांचा अभ्यास करणारे शास्त्र.

4.मानवी आचरणावर दिले जाणारे नीतिनिर्णय, ते देताना आधरभूत ठरणारे ध्येय व त्यासाठी आवश्यक असणारे नियम या सर्वांचा अभ्यास करणारे शास्त्र.

# नीतिशास्त्राच्या शाखा

- 1. पारंपरिक नीतिशास्त्र (Traditional Ethics)

  व्यक्तीच्या वैयक्तिक आचरणाचा आदर्शात्मक अभ्यास करणारे शास्त्र

- 2. अतिनीतिशास्त्र (Metaethics)

  नैतिक पदे / संकल्पनांचे भाषिक विश्लेषण करणारे शास्त्र

- 3. उपयोजित नीतिशास्त्र (Applied Ethics)

  व्यक्तीच्या सामाजिक आचरणाचा आदर्शात्मक अभ्यास करणारे शास्त्र

# उपयोजित नीतिशास्त्राच्या शाखा

- 1. जैव नीतिशास्त्र **(Bio Ethics)**

  यात प्रामुख्याने थेट मानवी जीवनाशी निगडित समस्यांचा विचार केला जातो. उदा. भ्रुण हत्या, दयामृत्यू, अवयव प्रत्यारोपण, आत्महत्या, प्रतिरूप ई.

- 2. व्यापार नीतिशास्त्र **(Business Ethics)**

  यात प्रामुख्याने व्यापार व उद्योग जगताशी निगडित व्यक्तींच्या आचरणाचा आदर्शात्मक अभ्यास केला जातो. उदा. मालक – कामगार संबंध, व्यापारी–ग्राहक संबंध, व्यापारसंहिता. ई.

# उपयोजित नीतिशास्त्राच्या शाखा

- 3. व्यावसायिक नीतिशास्त्र (Professional Ethics)

  यात प्रामुख्याने विविध व्यवसाय करणा–या व्यावसायिक आणि त्यांच्याशी निगडित व्यक्तींच्या आचरणाशी निगडीत प्रश्न आणि मूल्यांचा अभ्यास केला जातो.

उदा.वैद्यक रूग्ण संबंध, वैद्यकीय व्यवसायातील अनैतिकता, वैद्यकीय संहिता

विधिज्ञ अशील संबंध, विधि व्यवसायातील समस्या,विधिसंहिता

शिक्षक विद्यार्थी संबंध, शिक्षण व्यवसायातील समस्या, शिक्षक संहिता, विद्यार्थी संहिता

# व्यवसाय आणि व्यापार

- दोन्ही संस्था समाजातील समस्यांची सोडणूक करत असल्या तरी व्यावसायिकांना अधिक महत्व व प्रतिष्ठा मिळते. कारण –
- 1. व्यवसायात विशिष्ट कौशल्याचा वापर
- 2. व्यावसायिक स्वतःच्या कामाविषयी आनंदी असतो.
- 3. व्यावसायिक स्वतःच्या कामाविषयी अभिमानी असतो.
- 4. व्यवसाय सामाजिक उत्तरदायित्वातून केला जातो.
- 5. व्यवसायात चरित्र, सेवातत्परता, नम्रता, उदारता या गोष्टींना महत्व दिले जाते.

# व्यवसाय आणि व्यापार यातील भेद

- 1. व्यापारात अर्थाजन हा प्राथमिक हेतु तर व्यवसायात सेवा हा प्राथमिक हेतु असतो.
- 2.व्यापाराचा संबंध दृश्य,मूर्त,उपभोग्य वस्तुंशी असतो ज्याचे मूल्य पैशांनी ठरवत येते. व्यावसायाचा संबंध अमूर्त, अदृश्य सेवेशी असतो ज्याचे मूल्य पैशांनी ठरवता येत नाही.
- 3. व्यापार वैयक्तिक हिताला तर व्यावसाय सामाजिक हिताला प्राधान्य देतो
- 4. व्यापाराचे यश आर्थिक फायद्यावरून तर व्यवसायाचे यश सेवेच्या गुणवत्तेवरून ठरते.
- 5. व्यापारात सामाजिक उत्तरदायित्वाची भावना नसते ती व्यवसायात असते.